Phone No:- 07232 242456 E-Mail :- vngmcytlstore@gmail.com

**SHRI. VASANTRAO NAIK GOVT.MEDICAL COLLEGE&HOSPITAL,YAVATMAL**

# श्री.वसंतराव नाईक शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,यवतमाळ

**No.VNGMC&H/YTL/STORE/COVID KITS/E- QUOTATION/ 9309 /2025 DT :- 19 /06/2025**

**श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेतील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाकरीता आवश्यक कोवीड १९ किटस (Covid 19 Kits) च्या खरेदी करीता जाहीर ई – दरपत्रके मागविण्याबाबत.......**

## जाहिर ई-दरपत्रक सुचना

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेतील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाकरीता आवश्यक कोवीड १९ किटस (Covid 19 Kits) च्या खरेदीकरीता खालील जोडण्यात आलेल्या यादीनुसार इच्छुक पुरवठादारांकडुन ई – दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

मोहरबंद दरपत्रके सादर करण्याची **अंतीम तारीखः- 27 /०६/२०२५ दुंपारी** ०५.०० वाजेपर्यंत असुन, सदर दरपत्रक हे दिनांकः-30/०६/२०२५ रोजी दिवशी दुपारी १२.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात खरेदी समितीच्या सभेमध्ये उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल. सदर दरपत्रक सादर करतांना इच्छुक पुरवठादारांनी खालील अटी व शर्तीनुसारच दरपत्रक सादर करावे. **सदर कालावधी दरनिश्चिती पत्र निघाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष राहील.**

१) दरपत्रक हे मा.अधिष्ठाता,श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ यांच्या नावे सादर करावयाचे आहे.

२) दरपत्रकाच्या लिफाप्यावर **"श्री.व.ना.शा.वै.म. व रु.यवतमाळ येथील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाकरीता कोवीड १९ किटस (Covid 19 Kits) च्या खरेदीकरीता जाहीर ई – दरपत्रके "** चे दरपत्रक असे नमुद करावे.

३) दरपत्रक हे तांत्रिक लिफाफा (संबधित कागदपत्रे) व दराबाबतचा (सर्वकरांसहीत) लिफाफा असे दोन्ही लिफाफे वेगवेगळे सादर करण्यात यावे. तांत्रिक लिफाफामध्ये संस्थेने मागीतलेली **पुरवठादाराचे दुकान नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड,जी.एस.टीप्रमाणपत्र,कॅन्सल चेक/बॅंकेचा तपशील इ.** दस्तऐवजांच्या साक्षांकीत छायांकीत प्रती तसेच दराचा (सर्वकरांसहीत) लिफाफा संस्थेने मागीतलेल्या विहित नमुन्यातच पुरवठादाराने खालील नमूद बाबीचे किंमतीचे दर (सर्वकरांसहीत) नमुद असलेले विवरण पत्र सादर करण्यात यावे. दर हे हाताने लिहण्यात येवु नये, ते टंकलिखीत करुनच सादर करण्यात यावे.

४) पुरवठादाराने त्यांचे दर त्यांचे लेटरहेडवर संस्थेने दिलेल्या नमुन्यातच दिलेल्या क्रमाने देण्यात यावे.

५) जिथे दर द्यावयाचे नाही तिथे "इच्छुक नाही" असे स्पष्ट नमुद करावे.ती जागा रिकामी सोडण्यात येवु नये.

६) सर्व दर हे सर्व कर समाविष्ट करुनच नमुद करावे.

७) वेळोवेळी आदेशप्राप्त होताच संबंधित बाबीचा पुरवठा लवकरात लवकर करणे बंधनकारक राहील.

८) न्युनतम दर असणाऱ्या पुरवठादाराला वेळोवेळी पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर या संस्थेतील संबंधित विभागाला पुरवठा करण्यात यावा, तसेच या कार्यालयाची तक्रार असल्यास ४८ तासांच्या आत बाधित सेवा तात्काळ सुरु करुन देण्याची जबाबदारी आपली राहील.

९) संबंधित पुरवठयाचे देयक हे मा.अधिष्ठाता यांचे नावे सेवा देण्यात आलेल्या विभागप्रमुखाकडुन प्रमाणित करुन तीन प्रतित सादर करण्यात यावे. तदनंतर आपल्या देयकाची अदायगी या कार्यालयामार्फत करण्यात येईल.

अपुर्ण माहीतीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. आदेश/तक्रार प्राप्त होताच आदेशात नमूद सेवेचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

सदर दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाप्यामध्ये बंद करुन त्यावर **"श्री.व.ना.शा.वै.म. व रु.यवतमाळ येथील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाकरीता कोवीड १९ किटस (Covid 19 Kits) च्या खरेदीकरीता जाहीर ई – दरपत्रके "** असे नमुद करावे.

त्यावर पुरवठादाराने स्वतःचे नाव, संपुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमुद करावे व असा तयार केलेला दरपत्रकाचा लिफाफा सादर करण्यात यावा संस्थेने सुचीत केलेल्या वेळे नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.

(PTO)

"श्री.व.ना.शा.वै.म. व रु.यवतमाळ येथील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाकरीता कोवीड १९ किटस (Covid 19 Kits) च्या खरेदीकरीता जाहीर ई - दरपत्रके "

| SrNo | Name Of Kits | Pack Size Required | Rate with Incl GST |
|---|---|---|---|
| 1 | Viral Transport Medium (VTM) | Each/Nos | ------- |
| 2 | Covid 19 Rapid Antigen Test | 25 Test Pack | ------- |
| 3 | RNA Extraction Kits (Mag RNA Viral RNA – II Extraction Kits from G2M, Cat No G2M030320 | 96 Test Pack | ------- |
| 4 | Covid 19 RT PCR Kits (Applied Biosystem) Covi Path Covid 19 Kits Cat No A50780 | 96 Test Pack | ------- |
| 5 | RT PCR Plate Sealer | Each/Nos | ------- |

अधिष्ठाता
श्री.व.ना.शा.वै.महा.व रुग्णा.यवतमाळ

प्राध्यापक व विभाग प्रमुख
सुक्ष्मजीवशास्त्र विभाग
श्री.व.ना.शा.वै. महाविद्यालय
यवतमाळ